# गर्भातल्या बाळानं अनुभवली आईवरची हृदयशस्त्रक्रिया

## पाच महिन्यांच्या गर्भवतीसह भ्रूणाला जीवदान



सुधिना अबुबाकर

पणजी, ता. २७ (प्रतिनिधी) : गर्भात अंकुरणारा पाच महिन्यांचा इवलासा जीव. त्याच्या शरीराचे अवयवही अजून पुरेसे आकाराला आलेले नाहीत, पण त्याने गर्भातच आयुष्याचं सर्वांत मोठं आव्हान यशस्वी पेललं आहे. पाच महिन्यांच्या गर्भवतीवर अत्यंत दुर्मिळ हृदयशस्त्रक्रिया करण्यात आली आहे. कार्डियाक सर्जन डॉ. बालामुरली श्रीनिवासन, भूलतज्ज्ञ डॉ. दिव्या महालदार, डॉ. अमर प्रभुदेसाई आणि डॉ. सोफिया रॉड्रिग्ज यांच्या पथकाने प्रयत्नांची पराकाष्ठा करत सुधिना यांच्यावरील शस्त्रक्रिया यशस्वी केली. ज्यात डॉक्टरांनी गर्भवतीसह भ्रूणाला जीवदान दिले आहे.

सुधिना अबुबाकर यांच्या आयुष्यात नव्या जिवाची चाहूल लागल्याने त्यांचं कुटुंब आनंदून गेलं होतं, पण गर्भधारणेनंतर त्यांचा जुना हृदयरोग डोकं वर काढू लागला. त्यांच्या हृदयामधील डावा व उजवा भाग जोडणाऱ्या पडद्याला मोठे छिद्र होते. गर्भधारणेनंतर या छिद्रामुळे आतड्यांना होणारा रक्तप्रवाह वाढला होता. त्यामुळे रक्तदाबही वाढला होता. या हृदयरोगामुळे आई आणि मूल दोघांचे आयुष्य धोक्यात होते. सर्वच डॉक्टरांनी हात टेकले होते. अशात अबुबाकर कुटुंबाने मणिपाल

पान २ वर

# Manipal Hospital conducts rare surgery




Dr Sachin Jain, unit head, Manipal Hospitals Goa addressing the media alongwith Dr Balamurali Srinivasan and others.

**PANJIM:** Manipal Hospitals Goa conducted an open heart surgery on a pregnant woman Sudhina Abbubakar. The surgery was performed under the able leadership of Dr Balamurali Srinivasan, cardiac surgeon and an expert team of cardiologist & obstetrician comprising of cardiologist Dr Amar Prabhudesai, Obstetrician Dr Sophia Rodrigues and cardiac anaesthesiologist Dr Divya Mahaldar. Sudhina Abbubakar had a large hole in the heart that connected the left and right side collecting chambers of her heart. Though the hole was present since her childhood it never created any issue until last year. Gradually, the hole increased the blood flow into her lungs which in turn caused the pressure in the blood vessels of her lungs to go high, necessitating an open heart surgery.

# गर्भवती महिलेवर ओपन हार्ट सर्जरी

## माता, भ्रूणाला जीवदान | मणिपाल इस्पितळात शस्त्रक्रिया

**पणजी, दि.२७ (प्रतिनिधी) :**

मणिपाल इस्पितळात पाच महिन्यांची गर्भवती असलेल्या महिलेवर यशस्वीरीत्या ओपन हार्ट सर्जरी करण्यात आली आहे. यामुळे माता आणि तिच्या पोटात वाढत असलेल्या भ्रूणाला जीवदान मिळाले आहे.

पाच महिन्यांची गर्भवती असलेल्या ३६ वर्षीय एस. सुधिना अबुबाकर यांच्यावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. कार्डियाक सर्जन डॉ. बालामुरली श्रीनिवासन यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अमर प्रभुदेसाई, डॉ. सोफिया रॉड्रिग्ज, कार्डियाक अनेस्थियॉलॉजिस्ट डॉ. दिव्या महालदार या कार्डियालॉजिस्ट पथकाने ही यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत ओपन हार्ट यशस्वी शस्त्रक्रियेची माहिती मणिपाल



पणजी : पत्रकार परिषदेत माहिती देताना डॉ. सचिन जैन. बाजूला डॉ. बालामुरली श्रीनिवासन व इतर.

इस्पितळाचे प्रमुख डॉ. सचिन जैन यांनी दिली. ज्यांच्यावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली त्या अबुबाकर स्वतः उपस्थित होत्या.

सुधिना यांच्या हृदयामध्ये डावा व उजवा भाग जोडणाऱ्या पडद्याला मोठे छिद्र होते. अगदी जन्मापासून त्यांच्या हृदयाला हे छिद्र होते, मात्र त्यांना त्याची कल्पना नव्हती. पण जेव्हा त्या गर्भवती झाल्या तेव्हा त्यांना श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होऊ लागला.

ही समस्या गंभीर बनल्याने मातेसह बाळाचाही जीव धोक्यात आला होता. त्यांना गर्भपात करण्याचाही सल्ला देण्यात आला होता. यामुळे अबुबाकर यांच्या आई होण्याचे आपले स्वप्न कोमेजणार या विचाराने त्या निराश झाल्या होत्या. त्यात श्वासोच्छ्वास मोठा त्रास जाणवू लागल्यानंतर त्यांना मणिपाल इस्पितळात दाखल करण्यात आले.

ही आरोग्यसमस्या खूपच गंभीर आणि किचकट होती. हृदयामध्ये बिघाड असलेल्या गर्भवती महिला दगावण्याची अथवा तिचा गर्भपात होण्याची शक्यता अधिक असते. हृदयाच्या समस्येमुळे सुमारे एकतृतीयांशी महिला प्रसुतीकाळात दगावल्या जातात. पण आमच्या डॉक्टरांच्या पथकाने सारे कौशल्य वापरत ही शस्त्रक्रिया केल्याचा दावा मणिपाल इस्पितळाच्या डॉक्टराच्या पथकाने केला आहे.

मी विचारच केला नव्हता मला नवीन जीवन मिळेल. पण मणिपाल डॉक्टरांनी आपल्याला नवीन जीवनदान दिले, अशी प्रतिक्रिया अबुबाकर यांनी व्यक्त केली.

# गर्भातल्या बाळानं अनुभवली आईवरची हृदयशस्त्रक्रिया

पान १ वरून

इस्पितळ गाठले आणि त्यांना आशेचा किरण गवसला. तज्ज्ञांच्या बैठकीनंतर त्यांनी सुधिना अबुबाकर यांच्यावर ओपन हार्ट सर्जरी करण्याचा निर्णय घेतला आणि आई व बाळाला वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.

गर्भधारणेनंतर गरोदर महिलेचे हृदय दुप्पट वेगाने काम करते. बाळाला रक्तपुरवठा होण्यासाठी ते आवश्यक असते, पण सुधिना यांच्यावरील शस्त्रक्रियेवेळी त्यांचे हृदयच काही काळासाठी बंद होणार होते. त्या काळात बाळाला रक्तपुरवठा सुरू रहाणे आवश्यक होते. यासाठी अद्ययावत उपचार यंत्रणेचा वापर करत ४८ तास बाळाला रक्तपुरवठा सुरळीत सुरू राहील अशी व्यवस्था करण्यात आली. हृदयशस्त्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या औषधांचा गर्भावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी विशेष औषधांचा वापर करण्यात आला.

कार्डियाक सर्जन डॉ. बालामुरली श्रीनिवासन, भूलतज्ज्ञ डॉ. दिव्या महालदार, डॉ. अमर प्रभुदेसाई आणि डॉ. सोफिया रॉड्रिग्ज यांच्या पथकाने प्रयत्नांची पराकाष्ठा करत सुधिना यांच्यावरील शस्त्रक्रिया यशस्वी केली. ही शस्त्रक्रिया अतिशय किचकट होती. हृदयामध्ये बिघाड असल्याने गर्भवती महिला दगावण्याची किंवा तिचा गर्भपात होण्याची शक्यता असते, पण तरी हे आव्हान यशस्वीपणे पेलल्याचे डॉ. बालामुरली श्रीनिवासन यांनी सांगितले.

## एक तृतीयांश गर्भवतींना धोका

गर्भवती महिलेच्या हृदयरोगावर वैद्यकीय उपचारांसाठी नवे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. तरीही हृदयसमस्येमुळे सुमारे एक तृतीयांश गर्भवती प्रसूती काळात दगावल्या जातात, तर चार टक्के महिलांना प्रसूतीकाळात हृदयसमस्या उद्भवतात. गंभीर स्वरूपाचा हृदयरोग असणाऱ्या महिलांमध्ये प्रसूतीदरम्यान दगावण्याचे प्रमाण पंधरा ते तीस टक्क्यांपर्यंत असल्याचे डॉ. अमर प्रभुदेसाई यांनी सांगितले.

# MANIPAL HOSPITAL PERFORMS RARE OPEN HEART SURGERY TO SAVE MUM, UNBORN BABY

**BY A STAFF REPORTER**
reporters@gomantaktimes.com

**Panaji:** The Goa Manipal Hospital on Tuesday announced the successful treatment of a rare and first of its kind open heart surgery conducted on a 36-year-old pregnant woman Sudhina Abbubakar.

The surgery was performed under the leadership of cardiac surgeon Dr Balamurali Srinivasan along with an expert team of cardiologists and obstetrician.

Addressing a press conference at Panaji, Dr Srinivasan said, "this was a very rare and complex medical situation. The patient had a large hole in the heart that connected both left and the right side of her heart. Gradually, the hole increased the blood flow into her lungs which increased the pressure of blood inside blood vessels causing a very challenging situation for a doctors. Moreover, such situation also leads to maternal mortality. But the strong effort and determination of our team has helped performing this operation without any trouble."

Cardiologist, Dr Amar Prabhudessai said, "Initially, presence of significant heart disease inside patient had made us apprehensive about the situation. But, at the same time, we were also determined to save the life of both mother and child."




**Cardiac surgeon Dr Balamurali Srinivasan (3rd L) speaking at a press conference at Panaji on Tuesday. Others seated (from L to R) are Sudhina Abbubakar, Dr Sachin Jain, Dr Divya Mahaldar, Dr Amar Prabhudesai and Dr Sophia Rodrigues.**

Dr Prabhudessai said that despite advances in the management of maternal cardiovascular diseases, heart disease during pregnancy accounts for as much as one-third of the maternal mortality.

"While giving medicines to the patient, the team of doctors were extremely cautious so that it could not affect the life of an unborn baby, said," Dr Prabhudessai adding that they had only used those medicines which could normalise the condition of both mother and child. Cardiac anaesthesiologist Dr Divya Mahaldar said that they had monitored heart rate of both fetus and mother with the help of heart-lung machine, whereas latter was also provided adequate blood supply during the operation in order to maintain body's metabolic activity.

Also present during the press briefing were Manipal unit head Dr Sachin Jain and obstetrician Dr Sophia Rodrigues.